# ग्रामीण स्त्री शेतमजूरांची सोशिकता व वेतनभिन्नता

*वर्षा हैबती भोसले संशोधक विद्यार्थीनी* (Ph.D.), *अर्थशास्त्र विभाग,शवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*

..................................................................................................

***प्रस्तावना:*** *भारताच्या सध्याच्या लोकसंख्येच्या सुमारे ३३.३४ टक्के लोकसंख्या 'मुख्य शेतमजूर' यांची आहेत. (मुख्य शेतमजूर म्हणजे वर्षातील ३६० दिवसांपैकी १८० दिवसांपेक्षा जास्त दिवस शेतीत कामावर असणारे शेतमजूर होय.) त्यापैकी २६.२७ टक्के लोकसंख्या पुरुष शेतमजूरांची व ६.७६ टक्के स्त्री मुख्य शेतमजूरांची आहे. म्हणजेच एकूण ४५ दशलक्ष स्त्रिया मुख्य शेतमजूर आहेत. एकूण स्त्री लोकसंख्येचा विचार करता, सुमारे १४ टक्के स्त्री मजूर उत्पादक व ४६.२ टक्के स्त्रिया शेतमजूर आहेत. ४३.७ टक्के पुरुष हे उत्पादक आहेत व फक्त १९.६ टक्के पुरुष कामगार हे शेतमजूर म्हणून काम करतात. याचे मुख्य कारण म्हणजे शेतजमिनीची मालकी ही पुरुषांच्या नावे असल्यामुळे उत्पादक शेतकऱ्यांची संख्या वाढली. तथापि, स्त्री शेतमजूरांच्या संख्येत मात्र स्वातंत्र्योत्तर काळात वाढ होत गेली. (रसाळ, १९९२)सन २००१ च्या जणगणना अहवालानुसार १०६.७८ दशलक्ष शेतमजूर आहेत. यापैकी ५७.३३ दशलक्ष पुरुष व ४९.४५ दशलक्ष स्त्री शेतमजूरांचा समावेश आहे. एकूण लोकसंख्येशी पुरुष व स्त्री शेतमजूरांचे प्रमाण अनुक्रमे १०.७७ व ९.९६ टक्के इतके आहे. महाराष्ट्राचा संदर्भ लक्षात घेतल्यास राज्यात १,०८,१५,००० एकूण शेतमजूर आहेत. यामध्ये ५८,९१,००० (५४.४७ टक्के)स्त्री शेतमजूर व ४९,२५,००० (४५.५३ टक्के) पुरुष शेतमजूर आढळून आले.* (Census Report, 2001)*प्रस्तुत शोधनिबंधात शेतमजूर स्त्रियांच्या आर्थिक-सामाजिक स्थितीविषयक व शेतीतील कामाच्या वेतन विषयक समस्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रियांच्या अंगी चिकाटी, सहनशिलता, कष्टाळूपणा इत्यादी गुण असल्यामुळे सर्व अडचणींवर मात करून पुढे जाण्याचा ती प्रयत्न करते परंतु आजूनही तिला पूर्णपणे न्याय मिळालेला नाही. तिच्यावर अन्याय होतो, तिचे शोषण केले जाते, तिच्या अंगी असलेल्या गुणांचा विकास करण्याची तिला पुरेशी संधी मिळत नाही. अशिक्षित शेतमजूर स्त्रियांची अवस्था तर यापेक्षा वाईट आहे. ती विनातक्रार हे सर्व सहन करीत असते. संशोधिकेने स्त्रियांच्या हालअपेष्टा अगदी जवळून पाहिलेल्या असल्यामुळे त्यांच्यासाठी काहीतरी करता यावे या सदिच्छेने अशा स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील निवडक गावांची निवड केली आहे.*

***संशोधन पद्धतीचा आराखडा:*** *माळशिरस हा सोलापूर जिल्ह्याचा एक अर्धविकसित व काहीसा विकसनशिल तालुका आहे. हा लेख निरीक्षण, पाहणी, मुलाखती, प्रश्नावली, इ. तंत्राचा अवलंब करून तयार केला आहे. [प्रत्यक्ष प्रश्नावली भरून नोंदी केल्या त्यामुळे अनुसूची पद्धती* (Schedule Method) *वापरली असे म्हणता येईल.] तसेच ही पद्धत हेतुपूर्वक निवड पद्धतीनुसार निवडलेली आहे. यासाठी ११० स्त्री शेतमजूरांच्या दृष्टीने तालुक्याची रचना लक्षात घेतलेली आहे. प्रत्येक गावातील १० शेतमजूर अशा एकूण ११ निवडक गावातील फक्त स्त्री शेतमजूर निवडले. महत्त्वाचे म्हणजे प्रस्तुत लेखामध्ये फक्त स्त्री शेतमजूरांचाच चालू वर्षातील (२०११-१२) अभ्यास केलेला आहे. यामध्ये त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्न, खर्च, बचत, इत्यादीची माहिती संकलित केली. व सदर माहितीचे विश्लेषण संख्याशास्त्र पद्धतीचा अवलंब करून केलेले आहे. शेतमजूरांच्या आर्थिक व सामाजिक पाहणीसाठी शेतमजूर हा घटक न निवडता स्त्री शेतमजूरांचे कुटूंब हा आभ्यासाचा पायाभूत घटक मानून ११७ गावांपैकी ११ (१० टक्के) गावातील शेतमजूर कुटूंबाचा अभ्यास केलेला आहे.*

***संशोधनाची उद्दिष्टये:*** ***१.****स्त्री शेतमजूरांचे कामाचे तास व वेळेचे अभ्यास करणे. २.किमान वेतन कायद्यानुसार स्त्री शेतमजूरांचे वेतन मिळते का व त्यामधून त्यांच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होतात का ? याचा अभ्यास करणे. ३.स्त्री शेतमजूरांच्या कौटुंबिक जीवनाचा आढावा घेणे. ४.तालुक्यात स्त्री-पुरुष शेतमजूरांच्या वेतनामधील भिन्नतेचा अभ्यास करणे.५.स्त्री शेतमजूरांची व्यसनाधिनता याचे प्रमाण किती आहे ते पाहणे. ६.शासनाने पुरविलेल्या सोयींची स्त्री शेतमजूरांना कल्पना आहे हे पाहणे.*

***संशोधनाची गृहितके:*** ***१****स्त्री शेतमजूरांना समान कामासाठी पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते.*

*२.जास्त प्रमाणात स्त्री शेतमजूर निरक्षर असतात.*

*थोडक्यात, "जे श्रमिक दुसऱ्याच्या शेतात काम करून वस्तुच्या स्वरूपात किंवा रोख स्वरूपात मजुरी प्राप्त करतात त्याची शेतमजुरी हेच उत्पन्नाचे प्रमुख साधन असते, जे शेती व्यावसायात कोणतीही जोखीम स्वीकारत नाहीत, कामासंबंधी कोणताही निर्णय घेत नाहीत, अशा श्रमिकांना शेतमजूर म्हणतात."माळशिरस तालुक्यामध्ये शेती क्षेत्राची जी चौफेर प्रगती झालेली दिसून येते, त्यामागे या गावातील सहकारी संस्था, बँका व सुजान शेतकऱ्यांचा जितका वाटा आहे, तितकाच किंवा त्याहून जास्त वाटा या गावात शेतीत प्रामाणिकपणे राबणाऱ्या गरीब अज्ञानी व अशिक्षित शेतमजूरांचा आहे. या दुर्लक्षित शेतमजूरांचा अभ्यास*

*करण्याचा प्रयत्न करीत असताना या शेतमजूर व त्यांच्या कुटूंबाबातची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी सादर करणे आवश्यक वाटते. यामध्ये कुटूंबाचे आकारमान, साक्षरतेचे प्रमाण, वयानुसार वर्गीकरण, जातवार वर्गीकरण, उत्पन्न, खर्च, इ. तपशिलांचा अभ्यास करण्यात आला. याचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.*

***स्त्री शेतमजूरांची वेतनासंबंधी समस्याः कुटुंबाचे आकारमानः****सर्वेक्षणासाठी निवडलेल्या ११० स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबातील सदस्यांचे १ ते ६ असे क्रमशः वर्गीकरण केलेले आहे. ४ ते ६ या वर्गीकरणात ४ सदस्य असलेल्या कुटुंबांची संख्या सर्वात जास्त आहे. कारण भारतात ४ लोकांचे एक कुटुंब असे गृहित धरलेले आहे. 'हम दो हमारे दो ' या सरकारच्या योजनेमुळे ७९ (७१.९ टक्के) कुटुंबे आहेत. (पती पत्नी व दोन मुले) यावरून स्त्री शेतमजूर कुटुंबात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचा प्रसार झालेला आहे, असे म्हणता येईल. याचे श्रेय बऱ्याच प्रमाणात सरकारी दवाखाण्याकडे जाते. म्हणजेच त्यांनी कुटुंब नियोजन कार्यक्रम चांगल्या पद्धतीने अवलंबिला आहे, असे म्हणता येईल.*

***वयानुसार वर्गीकरणः*** *निवडलेल्या ११० स्त्रिया सर्व वयोगटातील आहेत, त्यानुसार असे आढळून आले की, निवडलेल्या ११० स्त्री शेतमजूरांपैकी सर्वाधिक म्हणजे ३९ स्त्रिया (३५.४ टक्के) २६ ते ३५ वयोगटातील आढळल्या.*

***साक्षरतेचे प्रमाणः****अभ्यासक्षेत्रातील स्त्री शेतमजूरांच्या साक्षरतेची माहिती संकलन केल्यानंतर असे आढळले की अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण ११० शेतमजूरांपैकी ७४ (६७.३ टक्के) शेतमजूर निरक्षर आहेत. याशिवाय १७ (१५.५ टक्के) स्त्री शेतमजूर फक्त पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या आहेत. अभ्यासासाठी निवडलेल्या एकूण स्त्रियांपैकी केवळ दोनच स्त्री शेतमजूर या महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या दिसून आल्या. यावरून लक्षात येते की ग्रामीण भागातील स्त्री शेतमजूर या मोठ्या प्रमाणात निरक्षर असून शिक्षित स्त्री शेतमजूरांची संख्या अगदी अल्प आहे. तरीही अशिक्षीत स्त्री शेतमजूरांनाही अलिकडे शिक्षणाचे महत्त्व समजू लागले आहे.*

***जातवार वर्गीकरणः****सर्वेक्षण पाहणीवरून असे आढळून आले की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती गटातील स्त्री शेतमजूरांची संख्या सर्वाधिक असून एकूण पाहणी केलेल्या ११० स्त्री शेतमजूरांपैकी त्यांचे प्रमाण अनुक्रमे ३७टक्के व २५ टक्के इतके आढळले. याशिवाय भटक्या विमुक्त गटामधीलही स्त्रियांचे प्रमाण जवळपास २१ टक्के इतके तर सर्वसाधारण गटातील स्त्री शेतमजूरांची संख्या ११ टक्के व इतर मागासवर्गीय गटामधील ६ टक्के इतके प्रमाण आढळून आले.म्हणजेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती गटातील स्त्री शेतमजूरांची संख्या जास्त आढळली. मात्र इतर मागासवर्गीय व भटक्या विमुक्त गटातील संख्या विरळ आढळून आली कारण त्यामध्ये हंगामी शेतमजूर आढळून आले.* ***उत्पन्न मिळविते सदस्यः*** *गावातील स्त्री शेतमजूरांच्याशिवाय तिच्या कुटुंबातील इतर काम करणारे स्त्री-पुरुषांची माहिती घेतली. त्यावरून असे आढळून आले की एकूण स्त्री-पुरुष काम करणाऱ्यांमध्ये शेतमजूर म्हणून ६४ (५८.२ टक्के) काम करणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे असा निष्कर्ष निघतो की, जवळपास ५८.२ टक्के कुटुंबात स्त्री-पुरूष दोघेही रोजगारी करतात. कारण इतके सदरच असलेली कुटुंबे कमी आहेत व ती त्यामध्ये लहान मुलांचा समावेश होतो. याशिवाय सर्वच कुटुंबातील सदस्यांना रोजगार मिळतोच असे नाही.*

**दारिद्र्य रेषेखालील स्त्री शेतमजूर कुटूंबे (BPL)**:*जवळजवळ ५६ (५०.९ टक्के) स्त्री शेतमजूर दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असलेल्या आढळून आल्या. कांही शेतमजूर स्त्रियांची आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण आढळली. परंतु काही ठिकाणी असे निदर्शनास आले की, गरीब स्त्री शेतमजूरांची कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली जिवन जगत असली तरी विविध शासकीय योजनांचा त्यांना लाभ प्राप्त होत नाही. यासाठी ग्रामीण भागातील विविध सामाजिक, राजकीय व आर्थिक घटक जबाबदार आहेत, ही वस्तुस्थिती आहे.* ***घराचे स्वरूपः****सर्वेक्षण पाहणीनुसार असे आढळून आले की ३ (२.७ टक्के) स्त्री शेतमजूर कुटुंबाची घरे गावाच्या मध्यभागी विभक्त अशी होती. तर ३४ (३०.९ टक्के) स्त्री शेतमजूरांची कुटुंबे मिश्र जातीची आढळून आली व ७३ (६६.४ टक्के) ही गावाच्या वेशीच्या बाहेर व विशेषतः मागासवर्गीय वसाहती / कॉलनी आढळून आल्या. त्यामध्ये महार, मातंग, वडर, रामोशी, इ. जातीचा समावेश होतो. येथे थोड्याफार प्रमाणात पूर्वीच्या रूढीपरंपरेनुसार जातवार वर्गीकरण आढळून आले.*

***एकूण उत्पन्नः*** *सदर सर्वेक्षणात विविध मार्गांनी उत्पन्न मिळते ते म्हणजे दिवसाचे (शेतमजूरी) वेतन, पशुपालन आणि इतर घटकांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार केलेला आहे. या सर्व घटकापासून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न काढलेले आहे.*

*तक्ता क्र.१ : स्त्री शेतमजूराच्या कुटूंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न (२०११-१२)*

| अ.क्र. | उत्पन्न (रू.) | स्त्री शेतमजूर कुटूंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १५,००० ते २०,००० | ०९ | ८.२ |
| २ | २०,००१ ते २५,००० | २८ | २५.५ |
| ३ | २५,००१ ते ३०,००० | ५९ | ५३.६ |
| ४ | ३०,००१ ते ३५,००० | १३ | १८.८ |
| ५ | ३५,००१ ते ४०,००० | ०१ | ०.९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकूण = | ११० | १०० |

स्त्रोतः मुलाखत

सन २०११-१२ मध्ये निवडलेल्या ११० स्त्री शेतमजूरांपैकी ९ (८.२ टक्के) स्त्री शेतमजूरांचेवार्षिक उत्पन्न रू.१५,००० ते रू.२०,००० या वर्गीकरणात आढळले. तर २८ (२५.५ टक्के) स्त्री शेतमजूरांचे वार्षिक उत्पन्न रू.२०,००१ ते रू.२५,००० इतके आढळले. व ५९ (५३.६ टक्के) स्त्री शेतमजूरांचे वार्षिक उत्पन्न रू.२५,००१ ते रू.३०,००० इतके आढळून आले.

**एकूण वार्षिक खर्च**:आभ्यासासाठी निवडलेल्या ११० स्त्री शेतमजूरांच्या कुटुंबाचा वार्षिक उपभोग खर्च किती होता याविषयी स्त्रियांना प्रश्नावलीच्या आधारे माहिती विचारली असता उत्पन्नापासून शेतमजूरांकडून कशा प्रकारे खर्च केले जाते याची माहिती संकलीत केली. उदा. जीवनावश्यक वस्तू, मनोरंजन, इत्यादींवर होणारा एकूण खर्च किती तर प्रत्येक घटकावर केल्या जाणाऱ्या खर्चाची एकूण खर्चाशी असलेल्या टक्केवारीचा येथे विचार केलेला आहे.

तक्ता क्र.२: स्त्री शेतमजूराच्या कुटुंबाचे सरासरी वार्षिक खर्च (२०११-१२)

| अ.क्र. | खर्च (रू.) | स्त्री शेतमजूर कुटुंबांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १५,००० ते २०,००० | १२ | १०.९ |
| २ | २०,००१ ते २५,००० | ३० | २७.३ |
| ३ | २५,००१ ते ३०,००० | ५९ | ५३.६ |
| ४ | ३०,००१ ते ३५,००० | ०७ | ०६.४ |
| ५ | ३५,००१ ते ४०,००० | ०१ | ०.९ |
| ६ | ४०,००१ ते ४५,००० | ०१ | ०.९ |
| | एकूण = | ११० | १०० |

स्त्रोतः मुलाखत

यावरून असे दिसून आले की, सन २०११-१२ मध्ये साधारणपणे ५९ (५३.६ टक्के) स्त्री शेतमजूर आपल्या उत्पन्नातून प्रतिवर्षी रू.२५,००० ते ३०,००० इतके रूपये खर्च करतात. म्हणजेच ११० स्त्री शेतमजूरांपैकी सरासरी १०१ (९१.८ टक्के) स्त्री शेतमजूर वार्षिक खर्च रू.३०,००० किंवा यापेक्षा कमी आढळला. थोडक्यात, त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मर्यादा पडत आहेत.

**१.वेतन निर्धारण**:संघटित क्षेत्रातील वेतन निर्धारण हे अत्यंत शास्त्रशुद्ध, सैद्धांतिक व तात्विक पायावर आधारित असते. पूर्वीच्या काळी व सध्याही स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमीच वेतन मिळते. अर्थात वेतन हे शारीरिक बळावर आधारलेले आहे. परंतु आजच्या स्त्री-पुरुष समानतेच्या सामाजिक दृष्टिकोनातून समान वेतनाचे कायदे अनेक देशात लागू केले गेलेले आहेत. मात्र असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्यांना विशेषतः महिलांना मिळणारे वेतन हे पुरुषांच्या तुलनेत कमी अदा केले जाते. याशिवाय शेतमजूरास उपलब्ध होणाऱ्या कामाच्या स्वरुपानुसारही वेतनामध्ये भिन्नता आढळते. उदा. शेतीक्षेत्रातील कुदळ-फावड्याची कामे, जमीन नांगरणे, मशागत करणे, इ. कष्टाची कामे पुरुषांकडून करून घेतली जातात. याशिवाय शेतातील रात्रपाळीचीही कामे पुरुषांकडूनच करून घेतली जातात.

सर्वेक्षणावरून असे आढळून आले की साधारणतः वेतन निर्धारण हे पुढील तीन घटकांच्या आधारे निर्धारित केले जाते.

**अ. कामाचे स्वरूप**:ग्रामीण भागामध्ये शेतमजुरीचा दर हा शेतमालकच ठरवीत असल्याचे आढळते. निवडक गावातील शेतीतील स्त्री शेतमजूरांसाठी असणारी मुख्य कामे म्हणजे खुरपणी, भांगलणी, तण काढणे, खोडवे वेचणे, ऊसाची लागण करणे, ऊसाचा पाला काढणे, मिरच्या व भुईमुगाच्या शेंगा तोडणे, इ. कामाच्या स्वरूपानुसार वेतन ठरत असते.**ब. कामाचे तास**:कामाचे तास कमी झाले तर कमी मजुरी व अधिक तास काम केल्यास अधिक वेतन शेतमजूरांना दिले जाते. कामाच्या वेळेची विभागणी दोन प्रकारात केली जाते. सकाळी ८ ते दुपारी २ आणि दुपारी २ ते सायंकाळी ६ हे दुसऱ्या वेळेचे काम मानले जाते व या कामासाठी वेगळी मजुरी कांही ठिकाणी दिली जाते. तसेच जर दोन्ही वेळ काम केले तर मजुरीही दुप्पट मिळते.**क. कामातील अटी**:सर्वेक्षणात असे आढळून आले की स्त्री शेतमजूरांच्या वयानुसारही मजुरीमध्ये भिन्नता आढळते. जिराईत व बागाईत गावांमध्येही मजुरीमध्ये तफावत दिसून येते. जिराईत गावांच्या तुलनेत बागायती गावांमध्ये स्त्री शेतमजूरांना अधिक दराने मजुरी प्राप्त होते. थोडक्यात, सर्वच ठिकाणी स्त्री शेतमजूरांना मिळणाऱ्या मजुरीच्या दरामध्ये भिन्नता आढळून येते.

**सरासरी मजूरीचा दर**: स्त्री शेतमजूरांना त्यांच्या कामाच्या मोबदल्यात मजुरीचा दिवसभराचा वेतनदर हा रोख पैशाच्या स्वरूपात दिला जातो. याचे तपशिल तक्ता क्र. ३ मध्ये दिलेले आहेत.

तक्ता क्र. ३ स्त्री शेतमजूरांचे सरासरी वेतनदर

| अ.क्र. | वेतनदर (रू.) | स्त्री शेतमजूरांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ९० | १२ | १०.९ |
| २ | ९५ | १ | ०.९ |
| ३ | १०० | ६२ | ५६.४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | १२० | ३५ | ३१.८ |

स्त्रोतः मुलाखत

सदर सर्वेक्षणामध्ये ज्या गावांचा आभ्यास केला त्या गावांमध्ये स्त्री शेतमजूरांना दर दिवसाची मजूरी ही रू. ९० ते १२० इतकी आढळून आली. यामध्ये सर्वसाधारण स्त्री शेतमजूरांना रू.१०० इतकी शेतमजुरी दिली जाते. याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेणे गरजेची आहे ती म्हणजे पुरुष शेतमजूरास मिळणारी दिवसाची मजुरी रू.२०० ते रू.२५० दिवसाला दिल्याचे आढळते.

**सरासरी वेतनदर व घरापासून कामाच्या ठिकाणचे अंतर:**सर्वेक्षणावरून असे आढळले की, आभ्यासाठी निवडलेल्या ११० स्त्री शेतमजूरांपैकी फक्त एकच स्त्री शेतमजूर ३ किमी अंतर घरापासून ते कामाच्या ठिकाणपर्यंत पायी चालावे लागते. व त्यांना रू. १०० मजुरी मिळते. तर ३९ (३५.५ टक्के) स्त्री शेतमजूर ४ किमी अंतरास रू. ९० ते १०० मजुरी, १३ (११.८ टक्के) स्त्री शेतमजूर ६ किमी अंतरास रू.९० ते १०० इतकी मजुरी, ५३ (४८.२ टक्के) स्त्री शेतमजूर ८ किमी अंतरास रू. ९० ते १२० इतकी मजुरी आणि २ (१.८ टक्के) स्त्री शेतमजूर १० किमी अंतरास रू.१०० इतकी मजुरी प्राप्त होते. आजही ग्रामीण भागातील स्त्री शेतमजूरांस जिथे काम उपलब्ध असेत तेथे पायी चालत जावे लागते. यासाठी कोणत्याही प्रकारची वाहतुकीची सोय नसते शिवाय त्यांना दिल्या जाणाऱ्या मजुरीच्या दरामध्येही कोणताही बदल होत नाही, असे आढळून आले. त्यामुळे या स्त्री शेतमजूर जबाबदाऱ्या पार पाडून जास्त अंतरावरीलही कामावर वेळेत पोहचावे लागते. हे करताना त्यांची खूपच ओढाताण होते.

**लगभेदानुसार वेतनभिन्नता:** या सर्वेक्षणात स्त्री व पुरुष यांच्यातील वेतनभिन्नता हा घटक निदर्शनास आणलेला आहे. साधारणतः स्त्रियांच्या तुलनेने पुरुषांना तेवढ्याच कामासाठी जास्त वेतन दिले जाते. स्त्री शेतमजूरांना या वेतन दराच्या तफावतीस तोंड द्यावे लागते. कारण त्यांच्या मते हे सर्व रुढी परंपरेने चालत आलेले आहे. स्त्री, पुरुष व मुले यांच्यासाठी वेतनाची एकच पातळी कोणत्याही गावामध्ये आढळून आली नाही. एकाच प्रकारच्या कामासाठी स्त्री शेतमजूरांना वेगवेगळा वेतन दर दिला जातो. तसेच तेथे असेही आढळले की 'समान कामासाठी समान वेतन' हे तत्त्व माहित नाही.

**स्त्री शेतमजूर पुरुषांपेक्षा कमी वेतनदर का स्वीकारतात ?** फक्त माळशिरस तालुक्यातच वेतन भिन्नतेची पातळी आढळून येत नाही तर संपूर्ण राष्ट्रीय पातळीवर ही समस्या भेडसावत आहे. परंतु 'समान कामासाठी समान वेतन' या तत्त्वानुसार जर स्त्री शेतमजूरांना वेतन मिळत नाही. कारण सरकारने या तत्त्वांचा / योजनांचा लक्षपूर्वक अवलंब केला जात नाही.

**१.कमी वेतनदर स्वीकारण्याची कारणे:**सर्वेक्षणावरून असे आढळून आले की पुरुषांच्या मानाने स्त्री शेतमजूरांना समान कामासाठी वेतनदर भिन्न का दिला जातो. याची स्त्री शेतमजूरांनी बहूपर्यायी पद्धतीने उत्तरे दिली. जवळपास एक तृतीयांश म्हणजेच ३४ (३०.९ टक्के) स्त्री शेतमजूरांनी सांगितले की, पुरुष हे जास्त शारीरिक कष्टाची कामे करू शकतात. व अशीच कामे शेतमालक पुरुष शेतमजूरांकडूनच करून घेतात. तर ४ (३.६ टक्के) जास्त वय असलेल्या स्त्री शेतमजूर कामावर येतात, परंतु यांना शेतमालक कमी वेतन देतात. तसेच ३५ (३१.८ टक्के) स्त्री शेतमजूरांच्या मते, पुरुष स्त्रियांच्या तुलनेत जास्त शारीरिक कष्टाची कामे करतात, म्हणून त्यांना अधिक वेतन दिले जाते. याशिवाय रूढी-परंपरा, तसेच स्त्रियांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्या प्रचलित वेतन दरापेक्षा कमी वेतनावर काम करून कुटुंबाला आधार द्यावा लागतो.

**२.रोजगारीचा कालखंड:**स्त्री शेतमजूरांना वर्षभर काम उपलब्ध होतेच असे नाही. साधारणपणे ८ ते ९ महिनेच काम उपलब्ध होते. बाकीचे ३ ते ४ महिने त्या शेतमजूरीशिवाय इतर कामे करतात. यामध्ये भुईमुगाच्या शेंगा व चिंचा फोडणे, धान्य निवडणे, तर पुरुषांना विहीर खणणे, खुदाई, बांध / ताल घालणे, इ. कामे असतात. तर काही दिवस दोघांनाही विशेषतः पावसाळ्यात बेकार रहावे लागते.

**स्त्री शेतमजूरांच्या वेतनासंबंधी समस्या:**सर्वेक्षणावरून असे आढळून आले की, स्त्री शेतमजूरांची वेतनासंबंधीची मुख्य समस्या म्हणजे त्यांना शासनाने ठरवून दिलेले किमान वेतन मिळत नाही. याचा विचार केला तर गेल्या ३० ते ४० वर्षातील शेतमजूरांचे मजुरीचे दर पाहिल्यास व त्यांच्यावर होणारा अन्याय भयानक स्वरूपाचा आहे, याची कल्पना येईल.कुटुंबाची किमान उपभोग पातळी पूर्ण होऊ शकेल इतकेही उत्पन्न त्यांना त्यांच्या वेतनातून मिळत नाही. त्यामुळे स्त्री शेतमजूर शेतमालकांकडून आवश्यक रक्कम उचल म्हणून घेतात. त्यामुळे संबंधीत स्त्री शेतमजूरास शेतमालक बोलवेल तेव्हा व देईल ते काम करावे लागते. याशिवाय वेतनाचा दरही कमी असतो. म्हणजेच येथे स्त्री शेतमजूराचे शोषण होत असते.वेतनवाढ घडवून आणण्याच्या दृष्टिने आवश्यक असणारी संघटीत सौदाशक्ती स्त्री शेतमजूरांकडे नाही व आगाऊ पैसे घेतल्यानेही स्त्री शेतमजूर व शेतमालक यांच्यात तिची सौदाशक्ती कमी राहते. सुगीच्या काळात म्हणजे मळणी व कापणीच्या वेळी मिळणारे वस्तुरूप वेतन मात्र पैशाच्या वेतनापेक्षा जास्त असते. परंतु त्याचा कालवधी अत्यल्प असतो. त्यामुळे स्त्री शेतमजूरांना कमी वेतनदारावर अधिक काम करावे लागते.

**१.स्त्री शेतमजूर व शेतमालक यांच्याशी संबंधीत समस्या:**सर्वेक्षण केलेल्या एकूण स्त्री शेतमजूरांपैकी ६५ (५९.१ टक्के) शेतमजूरांच्या मते, कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची पिळवणूक / शोषण होत नाही. तर २३ (२०.९ टक्के) स्त्री शेतमजूरांच्या मते, सक्तीने कामावर वेळेत हजर राहणे, उशिर झाल्यास ओरडणे, अशा प्रकारचा रोजचा त्रास या स्त्रियांना सहन

करावा लागतो, असे आढळले. तसेच १२ (१०.९ टक्के) स्त्री शेतमजूर वयाने अधिक असल्याने त्यांना कमी वेतन दिले जाते. कारण त्यांच्याकडून कमी काम होते, असे शेतमालकाचे मत आढळले.

**२ .कामावर गेल्याने स्त्री शेतमजूराच्या कुटूंबात निर्माण होणाऱ्या समस्या:**जेव्हा स्त्री शेतमजूर शेतमजूरीसाठी कामावर जाते तेव्हा त्यांना घरी परतल्यावर अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. कारण दिवसभर काम केल्यानंतर जेव्हा परत घरी येण्यास उशीर होतो त्यावेळी त्यांच्या लहान मुलांचे पालन-पोषण करण्यासाठी वेळ मिळत नाही. मुलांच्या शिक्षणासाठी आणि आर्थिक दुर्बलतेमुळे त्यांना मजुरी करावीच लागते. कांही वेळा तिचा पती कोणत्याच प्रकारचे काम करीत नसल्याने नाईलाजाने त्यांना काम करावेच लागते. त्यामुळे या सर्वेक्षणात कामावर गेल्यानंतर घरामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. यामध्ये ९५ (८६.४ टक्के) शेतमजूर स्त्रीयांचे पती त्यांना सहानभुतीपूर्वक म्हणजेच चांगली वागणूक देतात आणि घरातील वातावरण आनंदी ठेवतात. परंतु ३ (२.७ टक्के) स्त्री शेतमजूरांना त्यांच्या पतीकडून खुपच वाईट वागणूक मिळते. कांही काम न करता तिच्याच मजुरीच्या पैशातून दारु पिणे, जुगार खेळणे, इ. करतात. त्यांच्या कुटुंबातील मुलांचे शिक्षण व घरातील जबाबदारी पार पाडण्यासाठी ती एकटीतच दिवसभर घराबाहेर काभाडकष्ट करून घरात येऊन कौटुंबिक कलहांना तोंड द्यावे लागते. तसेच ११ (१० टक्के) स्त्री शेतमजूर विधवांचे जीवन जगत होत्या.

**३.स्त्री शेतमजूरांच्या इतर समस्या:**ग्रामीण भागातील स्त्री शेतमजूरांच्या पुढे अनेक स्वरूपाच्या समस्या उभ्या आहेत. त्यामध्ये मुख्यत्वे बेरोजगारी व त्या अनुषंगाने इतर अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. हा वर्ग अत्यंत दुबळा, अज्ञानी व असंघटीत आहे. अज्ञान व दारिद्र्यामुळे तो कमालीचा दैववादी देखील आहे. त्यांच्या दुर्बलतेचे व असंघटीतपणाचे हे एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे त्यांची सौदाशक्ती कमी आहे. म्हणजेच प्रचलित वेतन दर कमी असूनही अंदोलन करण्याची शक्ती त्यांच्यात नाही.स्त्री शेतमजूरांच्या बेरोजगारीमुळे त्यांच्या उत्पन्नावर व उपभोगावर वाईट परिणाम होतो. कारण वर्षातील ३ ते ४ महिने बेकार रहावे लागत असल्याने त्यांचे वार्षिक उत्पन्न कमी होते. व त्यांचा उपभोग मर्यादीत ठेवावा लागतो. त्यांना इतरही काही कारणांमुळे कामापासून वंचित रहावे लागते. म्हणजेच स्वतःचे व कुटुंबातील इतर व्यक्तिंचे आजारपण, नातेवाईक घरी आले किंवा त्यांच्याकडे जावे लागले तर त्यामुळे त्या दिवसांचे काम चुकते व सन समारंभ असल्यास त्यादिवशी घरी राहवे लागते. यामुळे त्यांच्या एकूण कामाच्या दिवसांमध्ये घट होऊन रोजंदारी कमी मिळते.स्त्री शेतमजूरांना आणखी दोन भूमिकेमधून जावे लागते. एक म्हणजे घरातील गृहिणीची भूमिका बजावून तिला दुसरी म्हणजे शेतमजूरी करून कुटुंबाच्या आर्थिक स्थितीला हातभार लावावा लागतो. त्यामुळे तिची फारच ओढातान होते. शेतात कामावर जायच्या आगोदर घरातील स्वयंपाक, धूणी-भांडी, मुलांचे संगोपण, या बाबींकडे लक्ष द्यावे लागते. आणि पुन्हा शेतामध्ये जमीन मालक सांगतील ते काम करावे लागते. या सर्वांचा आरोग्यावर फारच मोठा परिणाम होतो. कारण अधिक काबाडकष्ट व कमी विश्रांती, कमी पोषण तत्वांचा आहार अशी अवस्थांमधून त्यांना जावे लागते.

वास्तविक स्त्रीचे समाजातील, संसारातील, आर्थिक विकासातील, कृषी क्षेत्रातील, उद्योगधंद्यातील स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. व या क्षेत्रांत ती मोठ्या प्रमाणात सहभागी झालेली आहे. तिच्यावर होणाऱ्या अन्याय व अडथळयांवर मात करून ती विकास कार्यक्रमांमध्ये पुरुषांपेक्षा अधिक कार्यक्षम काम करीत असते. परंतु आजूनही तिच्यावर होणाऱ्या अन्यायाला मात्र वाचा फुटलेली नाही, तिच्या शोषणाचा अंत होत नाही, ही खंत वाटणारी गोष्ट आहे.

निष्कर्ष :भारतात स्त्री शेतमजूरांच्या समस्यांना म्हणावे तितके महत्त्व दिले गेले नाही. शेती क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांवर हंगामी बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळते. त्याचप्रमाणे त्यांना वेतनही पुरुषांच्या मानाने कमी मिळते. बेरोजगारी, कमी वेतन दरावर अधिक काम अशा जाळयात शेतमजूर स्त्रिया सापडलेल्या आहेत. शेतमजूर स्त्रियांना आर्थिक समस्यांबरोबरच सामाजिक समस्यांनाही तोंड द्यावे लागते. या सर्व समस्याकडे सर्वांकडून डोळेझाक होत आहे. म्हणून प्रस्तुत लेखामध्ये मर्यादित प्रमाणात स्त्री शेतमजूरांच्या आर्थिक, सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्याच्या हेतूने केलेल्या अभ्यासाचे
निष्कर्ष पुढीलप्रमाणे:

१.शेती क्षेत्रातील जवळजवळ सर्व प्रकारच्या कामामध्ये स्त्रियांचा सहभाग अधिक आहे.

२.सर्वेक्षण केलेल्या निवडक गावात जलसिंचनाच्या सोयींमुळे शेती विकासावर चांगला परिणाम झालेला आहे. ज्याच्याकडे भरपूर शेती आहे असा शेतकरी वर्ग सधन बनलेला आहे. मात्र या विकास प्रक्रियेचा शेतामध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या शेतमजूरांना म्हणावा तितका लाभ प्राप्त झाला नाही.

३.शेतमजूरी, पशुपालन व इतर स्त्रोतांपासून स्त्री शेतमजूराचे वार्षिक उत्पन्न हे सरासरी रू.७,५००० ते २८,००० या दरम्यान असल्याचे आढळते.

४.सर्वेक्षण पाहणीवरून असे आढळले की ४३ (३९.१ टक्के) स्त्री शेतमजूरांना शेतात कामावर शेतमालकाकडून त्यांची पिळवणूक होते. म्हणजेच शेतात जास्त वेळ काम केलेच पाहिजे किंवा दिलेले काम पुर्ण केलेच पाहिजे अशी सक्ती केली जाते. याऊलट ६७ (६०.९ टक्के) स्त्री शेतमजूरांच्या मते त्यांना कामासंबंधी व मजुरीसंबंधी कोणतीच तक्रार नाही. शेतमालक आदरार्थी

वागणूक देऊन कामावर विविध सोयी-सुविधा पुरवितात. उदा. पिण्याचे पाणी, जळाऊ लाकूड, पालेभाज्या इ.

५.सर्वसाधारणपणे ५३ (४८.२ टक्के) स्त्री शेतमजूर घरापासून ते कामाच्या ठिकाणापर्यंत ८ किमी अंतर चालत जावे लागते. व त्यांना वेतन दर रू.१०० ते १२० या दरम्यान दिला जातो.

६.शासनाने एकाच प्रकारच्या कामासाठी स्त्री-पुरुष दोघांनाही समान किमान वेतन दर ठरवून दिलेला आहे. मात्र आभ्यास क्षेत्राच्या पाहणीवरून असे दिसते की, शेतमजूराला किमान वेतन दरापेक्षा कमी दराने वेतन दिले जाते. तसेच एकाच प्रकारच्या कामासाठी स्त्रियांने पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते.

७.स्त्री शेतमजूरांची समस्या म्हणजे त्यांना मिळणारे वेतन हे त्यांच्या कामाच्या मानाने अत्यंत कमी आहे. या स्त्री शेतमजूर तिन्ही ऋतूंमध्ये काम करताना ऊन, पाऊस व थंडी या नैसर्गीक परिस्थीशी तोंड देत शेतामध्ये कामे करीत असतात. द्राक्षबागा, ऊसशेती, इ. ठिकाणी काम करताना त्यांना जास्त त्रास होतो. मात्र वेतन सर्व प्रकारच्या कामासाठी व सर्व हंगामात एकाच दराने दिले जाते.

८.ग्रामीण भागात शेतमजूरांची संघटना नसल्यामुळे वेतन वाढीसाठी ते अंदोलन करू शकत नाहीत. म्हणून त्यांना प्रचलित वेतन दरावरच काम करावे लागते.

**शिफारसी** :प्राचीन काळापासून काही अपवाद वगळल्यास स्त्रिला समाजात दुय्यम स्थान दिले गेले आहे. आजही यामध्ये विशेष फरक पडलेला नाही. स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासासाठी अनेक योजना शासनाकडून राबविल्या गेल्या व जात आहेत. परंतु या योजनांचा फायदा जास्तीत जास्त शहरातील, संघटीत लोकांनाच होतो, त्यामुळे ग्रामीण भागाला व विशेषतः स्त्री शेतमजूरांना या विकास योजनांचा अतिशय कमी लाभ झाला.माळशिरस तालुक्यातील स्त्री शेतमजूरांची आर्थिक व सामाजिक स्थिती व त्यांच्या वेतनविषयक समस्या समजावून घेतल्यानंतर पुढील शिफारसी कराव्यात असे वाटते.

१.सरकारने शेतमजूरांसाठी ज्या सवलती दिलेल्या आहेत, त्यांची माहिती शेतमजूरांना करून द्यावी. नविन कार्यक्रम आखण्यापेक्षा उपलब्ध कार्यक्रमच जास्त कार्यक्षमतेने राबविले पाहिजेत.

२.अशिक्षित शेतमजूरांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक आहे. मिशेरी, तंबाखू, दारू, गुटखा, गांजा, इ. आरोग्यास घातक अशा घटकांपासून शेतमजूरांनी अलिप्त राहण्यासाठी प्रशिक्षण देणे महत्त्वाचे आहे.

३.निरक्षर शेतमजूरांना साक्षरतेसाठी प्रवृत्त केले पाहिजे.

४.सरकारने रोजगार हमीची कामे बिगर हंगामाच्या काळात या शेतमजूरांना उपलब्ध करून दिली पाहिजेत.

५.स्त्री शेतमजूरांना वर्षभर रोजगार मिळत नाही. त्यांच्या बेरोजगारीचे प्रमाण पूर्णपणे नाहिसे करता येत नाही, मात्र ते कमी करण्यासाठी बिगर शेती क्षेत्रामध्ये रोजगार निर्मिती करून दिली जावी. उदा. हस्तकला व्यवसाय, कुटीरोद्योग, जोडउद्योग, इ.

६.ग्रामीण भागात स्त्रियांमध्ये जनजागृती निर्माण केली पाहिजे. त्यासाठी सुशिक्षित स्त्रियांनी पुढाकार घेतला पाहिजे.

७.शेती क्षेत्रात किमान वेतन कायद्याची अंमलबजावनी केली जाते की नाही, याची काटेकोरपणे पाहणी केली जावी.

८.ग्रामीण भागामध्ये समान कामासाठी समान वेतन हे तत्त्व अमलात आणले पाहिजे.

९.स्त्री शेतमजूरांच्या संघटना स्थापन केल्या जाव्यात.

१०.स्त्री शेतमजूरांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करण्यासाठी राज्य पातळीवर विशेष अभ्यास गटाची नेमणूक केली जावी. व त्यांच्या शिफारसी विचारात घेऊन स्त्री शेतमजूर विकास कार्यक्रम राबवावा.

महत्त्वाचे म्हणजे नविन कार्यक्रमापेक्षा नविन उपायांपेक्षा कार्यक्रम हे देशप्रेमी व व्यवहारी शासनाची गरज आहे. माळशिरस तालुक्यातील शेतमजूर प्रतिनिधीक आहेत. त्यांच्या समस्या, त्यांची स्थिती ही देशातील अन्य ग्रामीण भागातील शेतमजूरांप्रमाणेच आहे. त्या दृष्टीने या सर्वेक्षणाचे व केलेल्या शिफारसींचे महत्त्व आहे. या सूचना अंमलात आणल्यास तात्काळ या समस्येची उकल दृष्टीपथात येईल, यात शंका नाही.

**सदर्भः**


1. Kumari Sujata & Koushik Vandana (2007), '*Problems of Rural Women Entrepreneurs: An analysis*', Rural India, G.K.Puranik, Adarsh Seva Sangh, Bombay
2. Savitri Arputhamurthy (1990), 'Women Work and Discrimination', Ashish Publishing House, New Delhi
3. Government of India, Census Report, 2001, New Delhi

४. भारत सरकार (१९६८), नियोजन मंडळ कार्यक्रम मूल्यमापन समिती

५. पाटील लीला रंगनाथ (१९७८), भुदरगड तालुक्यातील शेतमजूरांचा सामाजिक-आर्थिक आभ्यास, पीएच.डी. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

६. जुगळे योजना (१९९०), शिरोळ तालुक्यातील स्त्री शेतमजूराचे वेतन आणि संबंधीत समस्या, एम.फील. शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

७. रसाळ उषा श्रीपती (१९९२), म्हैशाळ गावातील स्त्री शेतमजूरांचा सामाजिक-आर्थिक आभ्यास, एम.फील. शोधप्रबंध,